आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१० नोव्हेंबर २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची यंदाची पहिली अर्थसंकल्पपूर्व बैठक अर्थतज्ज्ञांबरोबर, दुसरी बैठक कृषीतज्ज्ञ आणि शेतकरी संघटनांबरोबर

- येत्या ५ वर्षात दोन लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या प्रत्येक शहरात किमान एक नागरी सहकारी बँक उभारण्याचं उद्दिष्ट ठेवावं, असं केंद्रीय सहकारमंत्र्यांचं सहकारिता महाकुंभमधे आवाहन

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातल्या मतदानासाठी यंत्रणा सज्ज

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज अंगोलाच्या संसदेला संबोधित करणार

आणि

- अमेरिकेतल्या शटडाऊनवर तडजोडीचा मसुदा तयार

<><><><><>

आगामी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७च्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अर्थतज्ज्ञांसोबतची पहिली बैठक घेतल्याची माहिती अर्थमंत्रालयाने समाजमाध्यमाद्वारे दिली.अर्थमंत्रालयाच्या अर्थ व्यवहार विभागाचे सचिव, केंद्र सरकारचे मु◌ुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन आणि वरिष्ठ अधिकारी या बै◌ेठकीला उपस्थित होते. यानंतर अर्थमंत्री, कृषी क्षेत्रातल्या तज्ज्ञांसोबत आणि शेतकरी संघटनांसोबत बैठक घेणार आहेत.

<><><><><>

देशातल्या दोन लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या प्रत्येक शहरात येत्या पाच वर्षांत किमान एक नागरी सहकारी बँक असली पाहिजे, असं उद्दिष्ट ठेवावं, असं आवाहन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी दिल्ली इथं आज सहकारिता महाकुंभ २०२५ या, शहरी सहकारी कर्जासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या दोन दिवसीय परिषदेत धोरण, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यावर

सखोल मंथन व्हावं आणि परिषदेच्या शेवटी प्रसिद्ध होणाऱ्या जाहीरनाम्यात सहकार क्षेत्रासमोरच्या अडचणी सोडवण्याचे उपाय आणि कालबद्ध कार्यक्रम असावा, जेणेकरून शहरी सहकारी बँकांच्या विस्ताराचं स्वप्न लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात शहा यांनी सहकार डिजी पे आणि सहकार डिजी लोन या दोन डिजिटल मंचांचा प्रारंभही केला. या दोन मंचांचा मोठा फायदा सहकारी बँकांना होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**- *- होल्ड... बाईट- अमित शहा - -***

अमूल आणि इफको या भारताच्या सहकार क्षेत्रातल्या कंपन्यांनी, जागतल्या आघाडीच्या सहकारी संस्था म्हणून स्थान मिळवल्याबद्दल शहा यांनी त्यांचं अभिनंदन केलं. देशातल्या सहकारी संस्था मजबूत करण्यासोबतच वंचितांना वर आणण्याचं ध्येय सहकार मंत्रालयानं ठेवलं असल्याचं त्यांनी सांगितलं. सहकार संस्थांनी कामाचा दर्जा सुधारणं, आर्थिक शिस्त कायम ठेवणं आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानात पारंगत असलेल्यांना या प्रणालीत आणणं गरजेचं असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीचं मतदान उद्या होणार असून निवडणूक आयोगाकडून मतदानासाठी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. या टप्प्यात १२२ मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

*(बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठी १२२ मतदारसंघात ४५ हजार मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. उद्या सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान होईल. काही मतदारसंघांमधे सुरक्षेच्या कारणास्तव मतदानाची वेळ संध्याकाळी पाच वाजेपर्यंत असेल. या टप्प्यात १ हजार ३०२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून तीन कोटी ७० लाख मतदार या उमेदवारांमधून आपल्या लोकप्रतिनिधीची निवड करणार आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून नेपाळला लागून असलेल्या सीमा तसंच उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल आणि झारखंडला लागून असलेल्या सीमा बंद करण्यात आल्याचं पोलीस महासंचालक विनय कुमार यांनी सांगितलं. तसंच*

*भारत-नेपाळ सीमेवरील मैत्री एक्स्प्रेस रेल्वे सेवा निवडणुकीपुरती बंद केल्याचंही त्यांनी सांगितलं.*

*या टप्प्यात भाजपा ५३, संयुक्त जनता दल ४४ आणि लोकजनशक्ती पार्टी रामविलास १५ जागांवर निवडणू◌ूक लढत आहे. तर महाआघाडीमधे राजद ७१, काँग्रेस ३७, व्हीआयपी  ८, भाकप माले ६, भाकप ४ आणि माकप एका जागेवर निवडणूक लढत आहे. सहा मतदारसंघांमधे महाआघाडीतल्या उमेदवारांची मैत्रीपूर्ण लढत होत आहे.)*

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिका निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार असल्याची घोषणा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज केली. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. नाशिकमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि महाविकास आघाडीनं एकत्र निवडणूक लढवायचा निर्णय स्थानिक पातळीवरच्या नेत्यांनी तिथली राजकीय परिस्थिती बघून घेतला असून तसे सर्व अधिकार त्यांना दिलेले आहेत, असं त्यांनी सांगितलं. महाविकास आघाडीतल्या घटकपक्षांच्या व्यतिरिक्त, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना सोडून इतर कोणत्या पक्षांसोबत आघाडी करावी, याचा निर्णय स्थानिक पातळीवरच्या नेत्यांनी घ्यावा, हीच आपली भूमिका असल्याचं ते म्हणाले. निवडणूक आयोगाची भूमिका स्वच्छ नसल्याचा आरोप करून, बोगस मतदार याद्यांच्या आधारे निवडणुका होत असतील, तर लोकशाही टिकेल का, असा सवाल त्यांनी विचारला.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज अंगोलाची राजधानी लुनाडामध्ये अंगोलाच्या संसदेला संबोधित करणार आहेत. अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ लोरन्को यांच्याशी काल त्यांची विविध क्षेत्रांत द्विपक्षीय सहकार्य आणखी मजबूत करण्यावर विस्तृत चर्चा झाली. ऊर्जा, पायाभूत सुविधा, संरक्षण, आरोग्य, शेती आणि डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये भागीदारी वाढवण्यावर त्यांनी भर दिला. मत्स्यपालन, जलकृषी, सागरी संसाधन आणि इतर विषयांवर सहकार्य वाढवण्यासाठी दोन सामंजस्य करारही यावेळी करण्यात आले.

अंगोलाला भेट देणाऱ्या मुर्मू पहिल्याच भारतीय राष्ट्रपती असून त्या उद्या अंगोलाच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात सहभागी होणार आहेत. अंगोलातल्या भारतीय

समुदायाशीही त्या संवाद साधतील. आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती बोत्सवाना देशाला भेट देणार आहेत.

<><><><><>

अमेरिकेतल्या शटडाऊन वर तोडगा काढण्याच्या दृष्टीनं सिनेटने  तडजोडीच्या एका मसुद्याला काल मंजुरी दिली. बहुमतासाठी आवश्यक नेमकी ६० मतं विधेयकाच्या बाजूने पडली. सर्व रिपब्लिकन खासदारांसह  ८ डेमोक्रॅट्सचा कौलही विधेयकाला मिळाला. आता त्यावर संसदेची मान्यता मिळणं आणि अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची स्वाक्षरी होणं गरजेचं आहे. अनेक सरकारी कर्मचाऱ्यांना कामावरुन काढण्याचा, अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचा आदेश, या विधेयकामुळे रद्दबातल ठरला आहे. शटडाऊनच्या तिढ्यामुळे अमेरिकेत गेले अनेक दिवस विविध क्षेत्रातलं सरकारी कामकाज ठप्प झालं होतं. यावेळचा शटडाऊन आजवरचा सर्वात दीर्घकाळ चाललेला शटडाऊन होता.

<><><><><>

इजिप्तमध्ये कैरो इथं सुरू असलेल्या, ISSF जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल नेमबाजी प्रकारात भारताच्या अनिश भानवालाने रौप्यपदक पटकावलं. अंतिम फेरीत अनिशने २८ वेळा लक्ष्यभेद केला.

<><><><><>

गोव्यात सुरू असलेल्या फिडे बुद्धिबळ विश्वकरंडक स्पर्धेत, कार्तिक वेंकटरमण यानं बोगदान-डॅनियल डीक याच्यावर मात करत चौथ्या फेरीत प्रवेश मिळवला. तर विदित गुजराती, नारायण एसएल तसंच विश्वविजेता डी. गुकेश आणि अरविंद चिंथबरम यांना पराभवाला सामोरं जावं लागलं.

अर्जुन एरिगैसी, आर. प्रज्ञानंद, पी हरिकृष्ण आणि जागतिक ज्युनियर विजेता व्ही प्रणव यांनी आधीच चौथ्या फेरीत प्रवेश मिळवला आहे.

<><><><><>

प्रसिद्ध तेलुगु कवी, गीतकार आंदे श्री यांचं आज निधन झालं. ते ६४ वर्षांचे होते. वेगळ्या तेलंगण राज्याच्या निर्मितीच्या चळवळीत ‘जय जय हे तेलंगणा’ हे आंदे श्री यांनी लिहिलेलं गीत नंतर तेलंगणाचं राज्य गीत म्हणून स्वीकारलं गेलं. त्यांना अनेक पुरस्कारांनी

सन्मानित करण्यात आलं होतं. आंदे श्री यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, केंद्रीय मंत्री किशन रेड्डी यांच्यासह सर्व पक्षाच्या नेत्यांनी आदरांजली वाहिली आहे.

<><><><><>

फिलीपिन्सला फंग-वॉन्ग वादळानं धडक दिली असून, साधारण ९लाखांहून अधिक नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. वादळामुळे दोन जणांचा मृत्यू झाला आहे. हे शक्तिशाली टायफून ताशी १८५ ते २३० किलोमीटर वेगाने जमिनीवर धडकलं. पूर्व फिलिपिन्समध्ये काल संध्याकाळी जोरदार पाऊस झाला.

<><><><><>

येत्या तीन दिवसांत मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थानचा पूर्व भाग आणि झारखंडमध्ये थंडीची लाट येण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत ईशान्य भारतात किमान तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट होण्याची अपेक्षा हवामान विभागाने वर्तवली आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीर आणि हरियाणा पोलिसांच्या पथकानं हरियाणातल्या फरीदाबादमधून मोठ्या प्रमाणावर स्फोटकं, शस्त्रास्त्रं आणि दारूगोळा जप्त केला. या प्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती फरीदाबादचे पोलीस आयुक्त सतेंदर कुमार गुप्ता यांनी दिली.

//<><><><><>//